# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

February 2020 Special Issue-22 Vol. 6

# The Role of Women in Global Development

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 22, Vol. 6 February 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

16. जलसंवर्धनाचे महत्व व उपाय 49
कुळभाऊ नामदेव कचरू

17. स्त्री सबलीकरणाचे उपाय 52
डॉ.महेश प्रभाकरराव देशमुख

18. संगीत आणि मानवी विकास 55
मानसी सचिन सरदेशपांडे

19. वसतिगृहातील मुलींचे आरोग्य ५७
डॉ. माया खांदाट , मनिषा मुलचंद राठोड

20. ''राजकारणातील महिलांचा सहभाग'' ६२
डॉ. जीवनज्योति निकाळजे (म्हस्के)

21. आर्थिक विकासात शेतीची भूमिका 65
प्रा.व्ही.व्ही.बाणापुरे, डॉ.प्रा.एम.जी.पवळे

22. पातंजल योग : प्राणायाम व आसनाचे महत्त्व 69
प्रा.भुसारे गोदावरी नारायणराव

23. अहमदपूर तालुक्यातील अनुसूचित जातीचे लिंग गुणोत्तर : एक भौगोलीक अभ्यास ७१
प्रा.चाटे एस.जे., प्रा.नरवाडे एम.व्ही.

24. बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार महिलांच्या समस्या 73
प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड

25. योग शिक्षण आणि व्याप्ती 76
महा.प्रा.इनकर विक्रम सोनाजी

26. डिजीटल मेडीयाचा ग्रंथालयावर होणारा प्रभाव ७९
रिता श्रीमंतराव कदम

27. भारतीय स्त्रीवादाचे जागतिक स्तरावरील योगदान ८१
डॉ. सारिका अशोकराव बुरगे

28. नारी और मानवाधिकार ८४
श्रीमती धुमाळ सीमा काशिनाथ

29. 'महिलांमध्ये वयाच्या चाळीशीनंतर 'योगशिक्षण' विषयक जनजागृती अभ्यासणे.' 86
प्रा. सुचिता विजय कुलकर्णी

30. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत कस्तूरबा गांधीचे योगदान 89
प्रा. सुनिता विठ्ठलराव भोसले

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22, Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार महिलांच्या समस्या

प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

---

**प्रस्तावना :**

भारतीय समाजातील पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये आज 21 व्या शतकात देखील महिला व महिलांचे अनेक प्रश्न आणि सामाजिक समस्या हया सार्वत्रिक स्वरूपाच्या असल्याचे दिसून येते. ज्या पध्दतीने पुरूषप्रधान संस्कृतीत सत्ता परिवर्तन झालेले नाही तसेच भटकंती करणाऱ्या समाजात देखील बदल झालेले नाही, याला बंजारा समाज देखील अपवाद नाही म्हणून सपूर्ण भारतभर भटंकती करणाऱ्या बंजारा समाजातील महिलांचे प्रश्न हे फार गंभीर स्वरूपाचे आहेत. भारताच्या स्वातंत्र्यानंतर देखील अनेक वर्षानी बंजारा समाजातील स्थित्यंतरामध्ये फार असे मोठे बदल झालेले नाही. कारण आज हे वास्तव आहे की, अनेक तांडयातून जवळपास 40 ते 50 टक्के पेक्षा जास्त कुटुंब हे पिढ्यानपिढ्या ऊसतोड कामगार म्हणून काम करीत आलेले दिसून येतात. हे वास्तव केव्हा बदलणार आणि या कुटुंबातील महिलांच्या समस्या कधी कमी होणार? हा महत्वाचा प्रश्न या समाजातील ऊसतोड कामगार कुटुंबाकडे निर्माण झालेला आहे. म्हणून विशेषतः या संशोधन लेखात बंजारा तांडयातील अत्यंत गरीब आणि अनेक वर्षापासून हे कुटुंब ऊसतोड कामगार म्हणून दरवर्षी काम करतात अशा ऊसतोड कामगार कुटुंबातील महिलांच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन करण्याचे प्रयत्न केले जाणार आहे.

**संशोधनाचे महत्व :**

बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार महिलांच्या समस्या निश्चितच अनेक वर्षापासून आहेत. परंतु त्यांच्या अस्तित्वाकडे कोणाचेही लक्ष नाही किंवा जाणिवपूर्वक या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी सामाजिक परितर्वन घडवून आणण्यासाठी तसे कोणतेही सामाजिक कार्य केले जात नाहीत. म्हणून बंजारा तांडयातील अनेक महिलांचे प्रश्न हे ऊसतोडणीच्या ठिकाणी निर्माण झालेले असतात किंवा एकूणच दैनंदिन जिवनात त्या महिलांसमोर अनेक आव्हाने असतात. या महिलांचे खेर तर सामाजिक शोषणच होतो का, असा ही प्रश्न निर्माण झालेला आहे. हा संशोधन लेख ऊसतोड कामगार महिलांच्या समस्याचे निर्मूलन कसे करता येईल यासाठी मार्गदर्शक ठरणार आहे. म्हणून या शोध निबंधात बंजारा समाजातील ऊसतोड कामगार महिलांच्या समस्यांचे अभ्यास करण्याचे प्रयत्न केले जाणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. ऊसतोड कामगारांची पार्श्वभूमी समजून घेणे.
2. बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार कुटुंबाचे जीवनमान समजून घेणे.
3. बंजारा तांडयातील महिलांच्या सामाजिक समस्याचे अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

या शोध निबंधात बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार महिलांच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन करण्यात येणार आहे यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेवून हा शोध निबंध अभ्यासला जाणार आहे. कोणतेही संशोधन म्हटले की, प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात येतो. प्राथमिक साधनांमध्ये संशोधक हा स्वतः ऊसमोड कामगार महिलांचे मुलाखत घेतली आहे. तसेच दुय्यम साधनामध्ये वर्तमानपत्र, मासिके व इतर संशोधनात्मक साहित्याचा आधार घेवून हा शोध निबंध तयार केले जाणार आहे.

**ऊसतोड कामगाराची पार्श्वभूमी :**

ऊसतोड कामगारांची संकल्पना समजून घेतल्यास असे निदर्शनास येईल की, या प्रक्रियेत काम करणारे लोक नक्की कोणते काम करतात आणि त्यांचे स्वरूप कशा प्रकारचे आहेत. ऊसतोड कामगाराच्या कार्य प्रणालीचे अभ्यास केल्यास असे म्हणता येईल की, जी व्यक्ती साखर कारखान्यास लागणाऱ्या कामात प्रत्यक्ष सहभागी होते, त्यानांच ऊसतोडणी कामगार असे म्हणतात. ऊस तोडणे, साळणे, त्याचे वाढे बाजूला काढून मोळी बांधणे या प्रकारचे काम करणाऱ्या कामगारांना ऊसतोडणी कामगार म्हणतात.

A Seasonal worker is a person who for more than half of the total number of days on which he actually works during the year worker a seasonal worker.

कोणत्याही ठिकाणाहून ज्या कामगारांची भरती मुकादमाकडून हंगामी स्वरूपाची केली जाते व जे कामगार ऊसतोडणीसाठी, साळणे, मोळया बांधून ट्रक–टॅक्टरमध्ये भरणी करतात किंवा बैलगाडीने कारखान्यापर्यंत वाहतूक करतात व त्या कामगारांची कारखान्यावर कोणतीही जबाबदारी नसते अशा कामगारांना ऊसतोडणी कामगार म्हणतात.

ऊसतोड कामगार हे अत्यंत गरीब आणि कष्टकरी लोक समूह असतो. या लोकांचे जीवन हे हंगामी स्वरूपाचे असते कारण की, सहामाही कष्ट हे आपल्या गावात वेगवेगळया शेतकऱ्याच्या शेतात करीत असतात. काही लोक सतत कामासाठी भंटकती करतात. परतु आजच्या समकालीन भारतात अनेक समाजात महिला देखील आपल्या कुटुंबासोबत कामासाठी, आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी, पालावरचे जीवन हातावर घेवून सतत भटकती करीत आहेत. यामध्ये



Scanned with OKEN Scanner

बंजारा समाजातील अनेक तांडयातील अनेक कुटुंब हे ऊसतोडीसाठी पिढयानंपिढया, कायमस्वरूपी भटकंती करीत आहेत. सध्या यवतमाळ जिल्हयातील बंजारा समाजाचे वास्तव देखील तशाच स्वरूपाचे आहे. कारण की, शेतकरी आत्महत्येसाठी सर्व परिचित असेलेला जिल्हा तसेच बिड जिल्हयानंतर आता यवतमाळ जिल्हयातील बंजारा तांडयातील अनेक ऊसतोड कामगार हे आपल्या महिला व कुटुंबातील सर्व सदस्यासोबत राज्य आणि राज्याबाहेर देखील दरवर्षी दसरा–दिवाळीच्या दरम्यान ऊसतोडणीला जातात. अशाप्रकारे प्रत्येक समाजातील अत्यंत गरीब कुटुंब हे हंगामी स्वरूपाचे काम करीत असतात. परंतु बंजारा समाजाचे आणि बंजारा समाजातील महिलांचे समाज वास्तव फार वेगळे असल्याचे दिसून येते.

**बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार महिलांच्या समस्या :**

बंजारा ही वृत्तीवाचक संज्ञा आहे. रानोमाळ भटकंती करणारा बंजारा किंवा गोरमाटी गाणप्रिय असून एक सामूदायिक लोकगण आहे. या जातीची स्वतःची एक स्वतंत्र संस्कृती आहे. भाषा, आचार, विचार, चालीरिती, प्रथा, परंपरा व पर्वजांकडून संक्रमित झालेले समाजविवेकी विचार आजपर्यंत या जातीने अबाधित राखले आहे. पेहराव, लोकगीते, बोलीभाषा, लोकाचार, लोकभ्रम, लोकसमजुती आणि एकूण लोकसंस्कृतीच्या संदर्भात स्वतंत्रपणा जपणाऱ्या या गोर बंजारा जातीची व्याप्ती ही जगभर पसरलेली आहे.

गोर बंजारा जातीच्या परिवर्तनाची वाटचाल ही खऱ्या अर्थाने आधुनिकीकरणाच्या प्रकियेनंतर मोठया प्रमाणात झालेली दिसून येते. ब्रिटिशकालीन बंजारा समाज, स्वातंत्र्यपूर्व बंजारा समाज, स्वातंत्र्योत्तर बंजारा समाज आणि विशेष करून जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या त्रिसुत्रीचे अनुबंध स्विकारताना बंजारा जातीच्या परिवर्तनाची दिशा आणि आजच्या वास्तव जीवन पध्दतीचे अध्ययन करणे खुपच महत्वाचे आहे. एके काळी समृध्द समाज व्यवस्थेपासून खुप दूर असलेला, परिघाच्या बाहेर असलेला बंजारा समाज आजच्या या जागतिकीकरणाच्या प्रवाहात या समाजात पाहिजे तसे परिवर्तन झालले नाही. विशेषतः बंजारा समाजातील महिलांचे अस्तित्व आजही विकासाच्या परिघाच्या बाहेर असल्याचे दिसून येते. आज तांडयाचे वास्तव स्वरूप पाहिले असता असे लक्षात येते की, 50 टक्के पेक्षा जास्त लोक हे पोटाची खळगी भरण्यासाठी रानोमाळ भटकंती करीत असतात. यासाठी कोणी ऊसतोडीला जातात तर कोणी विटभटटी कामगार म्हणून कामाला जातात. परंतु ऊसतोडीला जाणाऱ्याचे प्रमाण फार मोठया प्रमाणात आहेत. विशेषतः त्यामध्ये महिला वर्गाचा प्रमाण देखील जास्त आहे. म्हणून यामळे बंजारा समाजातील महिलांचे वास्तव जीवनमान आणि महिलांचे सामाजिक प्रश्न हे सर्व समाजासमोर निर्माण झाले आहे. यासाठी हा शोध निबंध लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

ऊसतोड कामगार महिलांची वैयक्तिक व कौटुंबिक माहितीचे अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, विभक्त कुटुंब असलेले आणि 30 ते 40 वयोगटातील महिलांचे प्रमाण ऊसतोडीसाठी जास्त आहे. साक्षर आणि निरक्षरतेचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, 80 टक्के महिला या निरक्षर असून ऊसतोड कामगार व शेतमजूर म्हणून काम करण्याऱ्याचे प्रमाण जास्त आहे. प्रत्येक महिलांना विचारले असता 90 टक्के पेक्षा जास्त महिलांचे कुटुंब हे दारिद्रयरेषेखाली असून आजही अनेक महिलांचे स्वतःचे घर नाही, त्यांचे वास्तव्य हे झोपडी अथवा कच्च्या घरात असलेले दिसून येते.

बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार महिलांचे सामाजिक जीवनमान अभ्यासले असता असे लक्षात येते की, तांडा संस्कृतीचे या समाजातील महिला जोपासना करण्याचे प्रयत्न करीत असतात. या कामगार कुटुंबाला विशेष सवलतीसह वेगळे आरक्षण देवून त्यांचे पुर्नउत्थान होणे गरजेचे आहे, कारण त्या कामगार कुटुंबातील शाळेत शिकणाऱ्या सर्व बालकांचे शैक्षणिक प्रश्न हा फार महत्वाचा असल्याचे दिसून येते. कारण जेवढे लोक तांडयातून ऊसतोडीला जातात त्यापैकी 50 ते 60 टक्के पेक्षा जास्त कुटुंबातील मुले ही शाळेतील शिक्षणापासून वंचित राहत असतात. कारण की, ते मुले आपल्या कुटुंबासोबत ऊसतोड कारखाना परिसरात आपल्या आईवडिलांसोबत राहण्यासाठी जातात. परंतु यामुळे अनेक कुटुंबातील लहान बालके, मोठी मुले ही सर्व आपल्या मागासलेल्या परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहत असतात. म्हणून या प्रमुख समस्येकडे कारखाना व्यवस्था आणि शासन व सरकारच्या वतीने या बंजारा तांडयातील मुला–मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हाच हा समाज व या समाजातील महिलांचे सामाजिक प्रश्न काही प्रमाणात सुटतील होतील.

ऊसतोड कामगारांची सख्या बंजारा समाजात फार मोठया प्रमाणात असून ते कमी करण्यासाठी तसे प्रयत्न सरकारच्या वतीने करणे गरजेचे आहे. त्याकरीता कामगार कुटुंबाला शासनाकडून मदत तसेच त्यांच्या मुलांना विशेष शैक्षणिक सुविधा, अल्पभुधारक शेतकऱ्यांना शेती मालाला भाव आणि ज्यांच्या कडे कुठलेही जगण्याचे साधन नाही अशा कुटुंवाला सरकारच्या वेगवेगळया शासकीय योजनेच्या माध्यमातून कामाची हमी देणे गरजेचे आहे, तेव्हाच या समाजातील महिलांचे प्रश्न किंवा शिक्षणाचे प्रश्न असेल ते कमी होतील किंवा त्यांचे निर्मूलन होवू शकेल. या करीता सरकार आणि शासनाचे तसे धोरण निर्माण करणे गरजेचे आहे.

बंजारा समाजातील सर्व घटकामध्ये बंजारा समाजाच्या संस्कृतीला विशेष महत्त्व दिले जाते. म्हणून आजही गरीब श्रीमंत असो अथवा नोकरदार वर्ग असो, त्यांच्यात बंजारा समाजामध्ये असलेलल्या पारंपारिक जीवनपध्दतीला विशेष महत्व आहे. ते लोक आजही पारंपारिक जीवन पध्दतीनुसार जीवन जगण्याचे प्रयत्न करीत असतात. आजही या कामगार लोकांना अथवा त्यांच्या कुटुंबातील महिलांना कोणत्याही राजकीय क्षेत्रात संधी दिली जात नाही तसेच मिळूही देत नाही. म्हणून हे लोक राजकीय क्षेत्रात देखील अलिप्त असलेले दिसून येते.



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 22, Vol. 6 February 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

ऊसतोड कामगार महिलांच्या कुटुंबाचे आर्थिक जीवनमान पाहिल्यास असे लक्षात येते की, सर्वाधिक प्रमाणात लोक ऊसतोडणीला जाण्यापूर्वी मुकादमाकडून काही प्रमाणात रक्कम प्राप्त करून घेतात आणि दोन ते तीन महिन्यात ते खर्च करून देखील मुक्त होतात, त्यामुळे त्याच्या कडे कुठल्या ही प्रकारची बचत होत नाही आणि उचल केलेली रक्कम कामाच्या मोबदल्यात फेड करून कसेबसे हालाकीचे जीवन जगून ते साधारणपणे आपले नियमितपणे चार ते पाच महिने काढण्याचे प्रयत्न करतात. परंतु यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत कुठल्याही प्रकारची सुधारणा झालेली दिसून येत नाही. जर या कामगार कुटुंबातील महिला समवेत पुरूषांना देखील अत्यंत अल्प दरात दिवसभर काम करावे लागत असेल तर त्यांच्या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचा प्रश्न असेल किंवा वर्ष भर जगण्याचा प्रश्न असेल याला सोडविण्यासाठी या कामगार लोकांना कामाची हमी आणि दैनंदिन मजुरी म्हणून प्रत्येकाला किमान 500 रूपये पेक्षा जास्त मिळणे गरजेचे आहे. कारण की महिला आणि पुरूष कामगारांची प्रत्यक्ष पाहणी करून आणि मुलाखत घेतल्यानंतर असे लक्षात येते की, या कामगार लोकांना दैनंदिन मजुरी ही फारच कमी प्रमाणात मिळत असते, त्यामुळे त्यांचे कोणतेही कार्य पूर्ण होत नाहीत म्हणून ते लोक पिढ्यांनपिढया हा व्यवसाय करण्यास तयार होतात.

महिलांच्या आरोग्य विषयक स्थितींचा अभ्यास पाहिल्यास असे म्हणता येईल की, ऊसतोड कामगार जे की बंजारा तांड्यातील असो अथवा कोणत्याही गावातील, त्यांना ऊसतोड परिसरात कोणतेही आजार झाले असेल किंवा दुर्घटना घडली असेल यावेळी कोणतेही सहकार्य केले जात नाही किंवा त्यांना कुठल्याही प्रकारची मदत केली जात नाही. अनेक कामगारांना विचारल्यानंतर असे म्हणता येईल की, आजार झाला आहे, अपघात झाला आहे, काम करतांना दुर्घटना घडली असेल तरी देखील कोणतीही मदत त्या कामगार कुटुंबाला मिळत नाही, असे कामगारांचे म्हणणे आहे. तसेच महिलांच्या आरोग्याचा प्रश्न फार गंभीर आहे. अनेक अशा घटना घडलेल्या आहेत की, महिला कामगार गर्भवती असताना त्यांची प्रसुती ही काम करतांनाच झालेली आहे, तेव्हा त्यांना कोणत्या ही आरोग्याच्या सुविधा प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच महिला कामगार असेल किंवा मुली असेल तर त्यांना त्या ठिकाणी महिला डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळत नाही व तशा आरोग्याच्या सोयी–सुविधा देखील मिळत नाही. म्हणून महिलांचे अनेक प्रश्न हे कामाच्या ठिकाणी उदभवतात, ते सोडविणे काळाची गरज आहे तेव्हाच महिला सुरक्षित राहिल आणि महिलांच्या सामाजिक समस्यांना वाचा फोडता येईल. फार पूर्वीपासून तांड्यातील महिलांचे ऊसतोडीला जाण्याच्या कारणामुळे गर्भाशये काढली जात होती, त्यात बीड जिल्हायातील महिलाचे प्रमाणात जास्त आहे. परंतु काळाच्या ओघात हा बदल जरी होत असला तरी महिलांच्या जगण्याच्या अस्तित्वाचे प्रश्न आहे तसेच आहेत असे निदर्शनास येते.

बंजारा तांड्यातील पारंपारिक जीवनपध्दतीचे आकलन केल्यास असे लक्षात येते की, पूर्वी झाडाच्या फुलापासून तयार केलेली दारू ही आरोग्यासाठी विशेषतः दमाच्या आजाराला असेल किंवा आरोगयविषयक त्याला औषध मानले जात असे परंतु नंतरच्या काळात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढल्यामुळे अनेक कुटुंब उध्दवस्त झालेली दिसून येते. यामध्ये ऊसतोड कामगार कुटुंबाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. म्हणून या समाजातील कामगारांना व्यसनमुक्ती करून पुरूषांसोबत महिलांचे देखील जीवनमान सुधारण्यासाठी परिवर्तन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

बंजारा तांडयातील ऊसतोड कामगार महिलांच्या समस्या समूळ नष्ठ करण्यासाठी अथवा महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महिलांना शिक्षण, संस्कार, जगण्याचे स्वातंत्र, सामाजिक शोषणापासून मुक्ती, समाजातील कुप्रथा नष्ठ करणे, अंधश्रध्दा विषयक विचारापासून परावृत्त करणे, सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात संधी देणे, आर्थिक स्वातंत्र देवून सम्मानाने जगण्यासाठी पाठबळ देणे, आर्थिक प्रगतीत समान हक्कांची संधी देणे, शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची आणि कुटुंबाच्या सुधारणेत अथवा निर्णयात संधी देणे, महिलांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे अथवा महिलांच्या आरोग्यांची काळजी स्वतःच्या कुटुंबात जास्त प्रमाणात घेणे, भक्कमपणे महिलांच्या पाठिशी कुटुंबातील सर्व सदस्य पाठबळ म्हणून उभे राहणे, कुटुंतील व्यसनाधीनतेचे प्रमाण असेल तर ते कमी करण्यासाठी सर्व सदस्यांनी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे बंजारा समाजातील ताडयातील ऊसतोड कामगार कुटुंबातील महिलांच्या समस्या वेगवेगळया माध्यमातून प्रयत्न केल्यानंतर यशस्वीपणे कमी करू शकतो व कालांतराने याचे निर्मूलन देखील करू शकतो.

**संदर्भग्रंथ :**

1 भांगे कालिदास, (2012) स्त्री–ऊसतोड कामगार, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
2 राठोड उमाकांत (2007) महाराष्ट्राच्या राजकीय प्रकियेतील सहकारी साखर उद्योगाची भूमिका आणि ऊसतोड कामगारांच्या समस्या : मराठवाडयाच्या विशेष संदर्भासह एक चिकीत्सक अभ्यास, प्रकाशित शोध प्रबंध.
3 वर्तमान पत्रातील कात्रणे.



Scanned with OKEN Scanner